Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- XI ISSUE- VI JUNE 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

# प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र घडविण्यासाठी ज्ञानरचनावादी अध्ययन—अध्यापन-एक प्रभावी उपक्रम

**शंकर उत्तमराव दांडगे**
पीएच.डी.संशोधक,शिक्षणशास्त्र विद्याशाखा
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

**सारांश ( Abstract )**

*महाराष्ट्र राज्यातील सरकारी प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी म्हणून राज्यात जून -2015 पासुन 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम' राबविला जात आहे. या कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये ज्ञानरचनावादी पध्दतीचा अवलंब करावा असे सूचविण्यात आले आहे.त्यानुसार राज्यातील 67827 जिल्हा परिषद शाळांमध्ये ज्ञानरचनावादी अध्ययन-अध्यापन पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. विद्यार्थी ज्ञानाचा रचियेता आहे हे तत्त्व स्विकारुन त्याला शिकण्यासाठी शाळांमध्ये शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यात येत आहे. लोकसहभागातून 66458 जिल्हा परिषदांच्या शाळा डिजिटल झाल्या आहेत. शिक्षकांनी स्वनिर्मित ज्ञानरचनावादी शैक्षिणिक साहित्य निर्मिती केली. या साहित्याच्या व डिजिटल साधनांच्या साह्याने अध्ययन—अध्यापन प्रक्रिया सुरु आहे. या विद्यार्थी केंद्रित पध्दतीमध्ये विद्यार्थी स्वत: शिकत असून शिक्षक सुलभक म्हणून मार्गदर्शन करित आहेत.*

*ज्ञानरचनावादी अध्ययन-अध्यापनप्रक्रियेचा अवलंब केल्यामुळे राज्यातील जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता वाढली असून 48561 शाळा प्रगत झाल्या आहेत.*

**प्रस्तावना :**

कोणत्याही राष्ट्राची प्रगती ही शिक्षणावरच अवलंबून असते.हे शिक्षण प्रभावीपणे दिले गेले तर उद्याची पिढी सक्षम निर्माण होऊ शकते. राज्यातील बालकांना गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळावे यासाठी महाराष्ट्र शासनाने जून 2015 पासून 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम' सुरु केला आहे.या कार्यक्रमांतर्गत अनेक उपक्रम राबविले जात आहेत. राज्यातील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांचा दर्जा व विद्यार्थ्याची गुणवत्ता वाढावी यासाठी हा कार्यक्रम या शाळांमध्ये प्रभावीपणे राबविला जात आहे. या कार्यक्रमांतर्गत सूचविलेला ज्ञानरचनावादी अध्ययन-अध्यापन हा उपक्रम आहे.पारंपांरीक अध्यापन पध्दती शिक्षककेंद्रित आहेत तर ज्ञानरचनावादी पध्दती ही विद्यार्थीकेंद्रित आहे. विद्यार्थी हा मातीचा गोळा नसून तोच ज्ञानाचा रचियेता आहे हे ज्ञानरचनावादाचे मुख्य तत्त्व आहे. या तत्त्वनुसार जिल्हा परिषदांच्या सर्वच शाळांमधून या पध्दतीचा अवलंब केला जात असून याचा सेकारात्मक परिणामही दिसू लागला आहे.

राज्यातील 67827 जिल्हा परिषदांच्या शाळांमधून ज्ञानरनावादी अध्ययन-अध्यापन पध्दतीचा अवलंब केला आहे. या नाविण्यपूर्ण उपक्रमामुळे विद्यार्थी सहज,हसत-खेळत शिकत आहेत.परिणामी त्यांची गुणवत्ता वाढली असून शाळांचा शैक्षणिक दर्जाही उंचावला आहे. ज्ञानरचनावादी प्रक्रिया राबविल्यामुळेच गेल्या चार वर्षात राज्याने शैक्षणिक क्षेत्रात देशात तेराव्या क्रमांकावरुन तिसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे.

**ज्ञानरचानावाद म्हणजे काय ?**

ज्ञानरचनावादाची संकल्पना म्हणजे अध्यापन पध्दती नसून ती विचार प्रक्रिया आहे. पूर्व अनुभवातून मिळालेले पूर्वज्ञान व त्यातून होणारी नवीन संकल्पनाची व संबोधाची रचना विद्यार्थी करतात. पूर्व ज्ञानाच्या आधारावर नवीन ज्ञान आकलन करणे यालाच ज्ञानरचनावाद म्हणता येईल. ज्ञानरचनावाद हे शिकण्याशंबधीचे एक तत्त्वज्ञान आहे. या तत्त्वानुसार मुल जगाबदलचे आकलन स्वत:च विकसित करुन त्या आकलनाची आपली म्हणून वेगळी रचना करित असते म्हणजे ज्ञानाची रचना करित असते.मुल स्वत:च्या कलेने,स्वत:च्या क्षमतेने, स्वत:च्या साहित्याने स्वत:च शिकते

VOL- XI ISSUE- VI JUNE 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

यालाच ज्ञानरचनावाद म्हणतात.ज्ञानाची रचना करण्याच्या प्रक्रिया कार्यान्वित ठेवणे हा ज्ञानरचनावादाच गाभा आहे.


**ज्ञानरचनावादाची तत्त्वे**

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 मध्ये ज्ञानरचनावादासंबंधी पुढील तत्त्वे नमुद केली आहेत.

- ज्ञान हे स्थितिशील नसून गतिशील आहे.
- पुर्वानुभवांच्या आधारे विद्यार्थी ज्ञानरचना करतात.
- सामाजिक,भाषिक व सांस्कृतिक आंतरक्रिया हा माहितीचा प्रमुख स्त्रोत असतो व याव्दारे ज्ञानाची निर्मिती होते.
- स्थानिक परिसराचा/परिस्थितीचा विद्यार्थ्यांच्या ज्ञानरचनेत महत्त्वाचा वाटा असतो.

**ज्ञानरचनावादी अध्ययन—अध्यापन :**

ज्ञानरचनावादी विचारसरणीनुसार शिकण्याची प्रक्रिया खालील तीन बाबींच्या समन्वयातून घडुन येते.




वरीलप्रमाणे विद्यार्थ्याचे पुर्वज्ञान त्याची शिकण्याची तयारी आणि अध्ययन अनुभव यांचा योग्य समन्वय वर्गामधील आणि अध्ययन—अध्यापनप्रक्रियेमध्ये घडवून आणावा लागतो.

ज्ञानरचनावादी दृष्टीकोनातून विद्यार्थी हे मातीचा गोळा नाहीत. त्यांच्याजवळ पुर्वज्ञान,कल्पना, समज आहे. प्रत्येक विद्यार्थी अद्वितीय असतो.कारण त्याचे अनुभव इतर विद्यार्थ्यांपेक्षा वेगळे असतात. अध्ययनाची जबाबदारी विद्यार्थ्यांची असते.अन्य कोणी सांगते म्हणून नव्हे तर त्याला आतून वाटते म्हणून तो शिकत असतो. ही शिकण्याची प्रक्रिया बाह्य प्रलोभनांवर अथवा धाकावर अवलंबून नसते. ज्ञानरचनावादी तत्त्वानुसार विद्यार्थ्यांमध्ये वस्तूस्थिती आणि समज यांच्यात संबध प्रस्थापित करण्यावर शिक्षकाने लक्ष केंद्रित करावे. विद्यार्थ्यांच्या प्रतिसादानुसार शिक्षकाने आपल्या अध्यापनात बदल करावा आणि पृथे:करण करणे,अर्थ लावणे,अंदाज बांधणे, या प्रक्रियांचा विद्यार्थ्यांनी अवलंब करावा. यासाठी त्यांना प्रोत्साहन द्यायला हवे शिक्षकांनी मुक्त प्रश्नांचा जास्तीत जास्त उपयोग करावा. आणि विद्यार्थ्यांमध्ये संवाद घडावा यासाठी सतत प्रयत्नशील राहवे.

'शिकविणे' यावरचे लक्ष काढून घेऊन ते 'शिकणे' यावर केंद्रित केले पाहिजे. ज्ञानरचनावाद हेच यांगतो.या प्रक्रियेत शिक्षकांनी सुलभकाची भुमिका पार पाडावी.

**प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम आणि ज्ञानरचनावाद:**

राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी यासाठी जून 2015 पासून प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम राबविला जात आहे. या कार्यक्रमांतर्गत अनेक उपक्रम राबविले जात असून त्या पैकी महत्त्वाचा उपक्रम म्हणजे ज्ञानरचनावादी अध्ययन—अध्यापन पध्दतीचा अवलंब करणे हा होय. राज्यातील जिल्हा परिषदांच्या एकूण 67827 शाळामध्ये ज्ञानरचनावादी प्रक्रियेचा अवलंब करण्यात येत आहे. या प्रक्रियेत शिक्षकाची भुमिका दिशा दाखविणाऱ्याची आणि साहित्य/साधने पुरविण्याची असते. शिकण्यायोग्य शैक्षणिक वातावरण निर्माण केले तर विद्यार्थी स्वत: शिकतात, ज्ञानाची निर्मिती करतात. विद्यार्थ्यांना ज्ञानरचनावादी पध्दतीने शिकता यावे यासाठी जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये वातावरण तयार होत असून यासाठी शाळा डिजिटल करणे व ज्ञानरचनावादी शैक्षणिक साहित्य निर्माण करणे यावर भर दिला जात आहे. शाळा डिजिटल करण्यासाठी प्रत्येक गावात लोक चळवळ उभी राहीली असून लोक सहभागातून राज्यभरात 424 कोटी रुपये निधी उभा राहीला आहे. यातून 66458 शाळा डिजिटल झाल्या आहेत. शिक्षकांनी स्वनिर्मित ज्ञानरचनावादी शैक्षणिक साहित्य तयार केले असून प्रत्येक शाळा इलेक्ट्रॉनिक व ज्ञानरचनावादी साहित्यांनी समृध्द झाल्या आहेत. यामुळे शाळांमधुन शैक्षणिक वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थी ज्ञानरचनावादी पध्दतीने शिकत आहेत. परिणामी विद्यार्थ्यांची गुणवता वाढत असून 48561 शाळा प्रगतशाळा झाल्या आहेत.

राज्यातील विविध भागात शैक्षणिक क्षेत्रातील अभिनव प्रयोग इतर शिक्षकांना पाहता यावेत यासाठी प्रगत शाळांना

भेटी,व शिक्षणाची वारी हे उपक्रम राबविले जात आहेत. शिक्षक प्रगत शाळांना भेटी देऊन, तेथील ज्ञानरचनावादी उपक्रम बघुन आपल्या शाळेत राबविलत आहेत. शिक्षणाची वारी हे उपक्रम पुणे,नागपूर,औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आले होते.उपक्रमशील शिक्षकांनी स्वनिर्मित ज्ञानरचनावादी शैक्षणिक साहित्याचे स्टॉल लाऊन सादरीकरण केले. या स्टॉलसना राज्यभारातून शिक्षकांनी भेटी दिल्या व तसे साहित्य स्वत: तयार केले व आपापल्या शाळेवर ज्ञानरचनावादी पध्दतीची प्रभावीपणे अमंलबजावणी केली. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र घडविण्यासाठी ज्ञानरचनावादी अध्ययन–अध्यापन हा प्रभावी उपक्रम ठरला आहे.

**समारोप :**

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधुन ज्ञानरचनावादी प्रक्रियेचा अवलंब करण्यात आला आहे. या पध्दतीमुळे शाळांमध्ये विद्यार्थी केंद्रित शैक्षणिक वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षकांच्या मदतीने व शैक्षणिक साहित्याच्या साह्याने विद्यार्थी स्वत्:च्या गतीने व सहज शिक्षण घेत आहेत.शिकणे ही प्रक्रिया आनंददायी होत असून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढली आहे व शाळा प्रगत होत आहेत.

**संदर्भसूची :**

1. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम अमंलबजावणी शासन निर्णय दि.22/06/2015
2. जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम अमंलबजावणी शासन निर्णय दि.01/01/2017
3. मुख्याध्यापक मार्गदर्शिका ( डिसेंबर 2012) म.रा.शै.सं.व प्र.प.पुणे
4. सातत्यपुर्ण सर्वंकष मूल्यमापन शिक्षक मार्गदर्शिका ( सप्टेंबर 2010) म.रा.शै.सं.व प्र.प.पुणे
5. लोकराज्य ( नोव्हेंबर 2018 ) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन.